सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
Savitribai Phule Pune University
(Formerly Pune University)
Ganeshkhind, Pune – 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक : ०२०– २५६२११८८/८९
Telephone: **020-25621188/89**
ईमेल / Email : affiliation@pun.unipune.ac.in

शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष)
Academic Section (Affiliation Unit)
वेबसाइट/Website: www.unipune.ac.in

संदर्भ क्र. : सीए/१८१६ **दिनांक : १३ नोव्हेंबर, २०२५**

तातडीचे व महत्वाचे

प्रति,
मा.प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्नित व्यावसायिक महाविद्यालये /
मान्यताप्राप्त परिसंस्था,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

विषय : शैक्षणिक वर्ष २०२६–२७ करिता व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संलग्नित महाविद्यालयांना आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांना संबंधित शिखर संस्थेस विविध मान्यतेकरिता विद्यापीठाचे 'ना हरकत प्रमाणपत्र' देणेबाबत...

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संलग्नित असलेल्या महाविद्यालय / मान्यताप्राप्त परिसंस्थेतील मा.प्राचार्य / संचालक यांना कळविण्यात येते की, विद्यापीठ कार्यक्षेत्रांतर्गत अस्तित्वात असलेल्या अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, व्यवस्थापनशास्त्र व बीबीए, बीसीए व तत्सम अभ्यासक्रमांच्या विद्यमान मान्यताप्राप्त परिसंस्थेत व महाविद्यालयात नवीन अभ्यासक्रम सुरु करणे, सध्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमांच्या प्रवेश क्षमतेत वाढ करणे याकरिता संबंधित शिखर संस्थेस प्रस्ताव सादर करण्याकरिता विद्यापीठाच्या ना हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता असते.

उपरोक्त बाब विचारात घेता शैक्षणिक वर्ष २०२६–२७ करिता संलग्नित महाविद्यालयांनी आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांनी विद्यापीठाच्या unipune.ac.in → BOD Online → Login Page (Enter College Credentials) → Online Services → NOC Request → NOC Dashboard → Select NOC Type → (NOC for New Course / NOC for Additional Intake) या लिंकवर माहिती भरुन संबंधित कागदपत्रे अपलोड करावीत. सर्व संबंधित कागदपत्रे सादर केल्यानंतरच या कक्षाकडून 'ना हरकत प्रमाणपत्र' देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

कळावे,

आपली,

(सुनिता हजारे)
(उपकुलसचिव, संलग्नता कक्ष)

शैक्षणिक वर्ष २०२६–२७ करिता ना हरकत प्रमाणपत्र देण्याकरिता आवश्यक कागदपत्रांची यादी खालीलप्रमाणे :

१. महाविद्यालय / मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या लेटरहेडवर अभ्यासक्रमाचे नाव व विद्यार्थी संख्या.
२. संस्थेच्या लेटरहेडवर संस्थेचा ठराव
३. विद्यापीठ मान्यताप्राप्त प्राचार्य / संचालक
४. NAAC/NBA.